# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
## कर आकारणी व करसंकलन विभाग
## मिळकतकर व फ्लोअरेज कर आकारणी संबंधी
## जाहिर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मिळकतीं मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण ८ नियम ९ खंड अ, ब, क, ड तसेच नियम १३ नुसार मिळकतकरांच्या आकारणीस, तसेच महाराष्ट्र (मोठ्या निवासी जागा असलेल्या) इमारती वरील कर [पुन्हा अधिनियम करणे] अधिनियम १९७९ [दि प्रिन्सिपल ॲक्टमधील कलम १०(१)] अन्वये फ्लोअरेज कराच्या आकारणीस योग्य आहेत, **त्यांच्या आवश्यक असलेल्या नोंदी व्यवहार्य असेल तिथपर्यंत सन २०१० - २०११ करिता पुर्ण करण्यात आल्या आहेत.**

मिळकतकरासाठी अधिनियम १९४९ मधील प्रकरण ८ चे नियम २१[१] अन्वये तसेच फ्लोअरेज करासाठी अधिनियम १९७९ मधील कलम ९ अन्वये निकटपूर्वीच्या वर्षाच्या [सन २००९-२०१०] पुस्तकातील नोंदी जशाच्या तशा नविन वर्षाच्या नोंदी म्हणून सन २०१०-२०११ करीता स्वीकारल्या आहेत.

उपरोक्त करआकारणी नोंदवही महानगरपालिकेच्या संबंधित करसंकलन विभागीय कार्यालयात मिळकतीच्या मालकी हक्काचे नावांसह मिळकतधारकांना/भोगवटादारांना पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

ज्या मिळकतधारकांना/भोगवटादारांना मिळकतकर व फ्लोअरेज कर आकारणी/ रजिस्टरमधील कोणत्याही नोंदीबाबत हरकत घ्यावयाची असेल, त्यांनी उक्त अधिनियमांच्या तरतुदी प्रमाणे ज्या कारणांवरुन मुल्यनिर्धारण विरुध्द तक्रार करण्यात आली आहे, त्याबाबत सबळ कारणासह लेखी स्वरुपाचे हरकत अर्ज मा. सहाय्यक आयुक्त (करसंकलन) यांचे नावे मिळकतधारकांची मिळकत ज्या करसंकलन विभागीय कार्यालयाचे हद्दीत आहे, अशा संबंधित विभागीय कार्यालयात दिनांक ३१/१२/२००९ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अगर तत्पूर्वी मिळेल अशा रितीने टपालाने पाठवावेत अथवा समक्ष आणून द्यावेत. मुदतीनंतर येणाऱ्या हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

चालू आर्थिक वर्ष सन २००९ - २०१० सह संपूर्ण कराची मागणी रक्कम भरलेल्या पावतीची फोटोप्रत सोबत जोडल्या शिवाय हरकत अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच यापूर्वी दिलेल्या व पूर्वीच्या कारणावरुन अथवा तत्सम मुद्दयावर अर्ज केल्यास आणि पूर्वी अर्ज फेटाळण्यात आला असल्यास अर्ज पुन्हा विचारात घेतले जाणार नाहीत. हरकत अर्ज उक्त नियमामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाखल केला नसलेस हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

तसेच ज्या मिळकतधारकांचे नवीन / वाढीव इमारत बांधकामाची नोंद मनपा दप्तरी झालेली नाही व अशा मिळकतींवर अद्याप मिळकतकर व फ्लोअरेज कराची आकारणी झाली नाही किंवा मिळकतीचे वापरात बदल झालेला आहे. अशा मिळकतधारकांनी आकारणी करण्यासाठी महानगरपालिकेच्या संबंधित करसंकलन विभागीय कार्यालयात लेखी अर्ज योग्य त्या मालकी हक्काचे कागदपत्रासह व प्रतिज्ञापत्रासह भरुन द्यावा.

**सही/-**
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

जाहिरात क्रमांक : १९२
दिनांक : २४/११/२००९